अनुसूचित जाती हक्क संरक्षणामध्ये राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाची भूमिका (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत "मानव अधिकार" विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाचा संशोधनपूर्व आराखडा

संशोधक

चंद्रकांत बालाजी भिसे

UGC NET JRF

मानवाधिकार विभाग

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मार्गदर्शक

प्रा.डॉ. कांबळे नारायण तुकाराम

समाजशास्त्र विभाग,

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद.

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

डिसेंबर-२०२२

अनुसूचित जाती हक्क संरक्षणामध्ये राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाची भूमिका (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)

प्रस्तावना :

भारतीय समाज रचना वैशिष्ट्यपूर्ण असून यामध्ये अनेक भाषा, जाती, जमाती, उपजातीचा विकास होत आलेला आहे. हा बदल जरी सामाजिक दृष्ट्या असला तरीही मानवी जीवनघडणीवर या व्यवस्थेमुळे मोठा परिणाम झाल्याचे दिसून येते. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक आणि राजकीय अशा सर्व पैलूवर या व्यवस्थेचा परिणाम होताना दिसतो परंतु भारतीय राज्यघटनेने मानवी मूल्याची जोपासना करून सर्व जाती धर्मातील नागरिकांना सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय आणि नागरी हक्क बहाल केले आहेत.

भारतीय समाज व्यवस्था ही जातीची उतरंड आहे. अनुसूचित जाती हा घटक सामाजिक उतरंडीचा सर्वात खालचा स्तर असून त्यांना विविध मानवी हक्कापासून वंचित राहावे लागत आहे.[१] त्यांना सामाजिक अन्याय अत्याचाराला सामोरे जावे लागत आहे. या अनुषंगाने अनुसूचित जाती आयोग त्यांच्या मानवी हक्काच्या संरक्षणासाठी कोणकोणत्या उपाययोजना करते आहे हा या अभ्यासाचा मुख्य हेतू आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेत प्रस्तावना करताना 'संयुक्त राष्ट्र सदस्य देश हे मुलभूत मानवी हक्कांवर, मानवाच्या प्रतिष्ठा आणि मूल्यावर, स्त्री-पुरुष समता आणि मोठ्या किंवा लहान राष्ट्रांच्या सर्वांगीण विकास करण्याची पुष्टी करण्याचा निर्धार व्यक्त करतात' असे प्रतिपादित करण्यात आले आहे. तसेच संयुक्त राष्ट्रांनी मांडलेल्या चार उद्दिष्टांपैकी एक म्हणजे कोणताही भेदभाव न करता मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्याचा प्रचार-प्रसार आणि प्रोत्साहन करण्यास प्राधान्य देईल हे सदस्य राष्ट्राला बंधनकारक असेल असे मानून १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणेसह सर्व राज्यांनी नागरिकांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, नागरी, सांस्कृतिक आणि धार्मिक अधिकारांना

प्राधान्य देवून मानवी संस्कृतीचे संरक्षण करण्यासाठीचे पाऊल उचलले.[२] आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवी हक्क संरक्षणासाठी निर्माण करण्यात आलेला पहिला जाहीरनामा आहे.

मानव अधिकाराला आधुनिक स्वरूप प्राप्त झाले असले तरी डार्विनच्या उत्क्रांतीवादी सिद्धांतानुसार मानव अधिकाराची जोपासना ही मानवी सभ्यतेच्या उदयापासूनच झाल्याचे पहावयास मिळते. जसे की आदि मानव दगडाच्या हत्यारांचा वापर करून अन्न मिळवत असे, समूहात टोळी करून इतरांचे संरक्षण करणे, नंतर वस्ती निर्माण झाल्या, शेतीचा शोध लागून मानव एका ठिकाणी स्थिर होऊन समाज निर्मितीच्या माध्यमातून सर्व मानव प्राण्याच्या विकासासाठी लोकशाही पद्धतीचा वापर करून मानवी हक्क जतन करण्याचा प्रयत्न करत आहोत. याच्या पाऊलखुणा आपणास मानवी हक्काचा इतिहास पाहताना दिसतात जसे सम्राट अशोक यांनी उभारलेला सारनाथचा स्तंभ, सायरस संहिता, राजा किंग जॉन यांचा मॅग्ना कार्टा, फ्रेंच राज्यक्रांती आणि अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनाम इ.[३] मानवाधिकाराचे उद्गाते म्हणावे लागतील.

मानवाधिकार म्हणजे प्रत्येक माणसाला असणारे निसर्गदत्त मूलभूत अधिकार होय. मनुष्य प्राणी हा पक्षी, प्राणी किंवा समुद्री जिवांसारखाच स्वातंत्र्य घेऊनच जन्माला आलेला आहे आणि स्वतंत्रतेला संलग्न काही मूलभूत अधिकार प्रत्येकाला असतात, या विचाराला जगभर मिळालेली मान्यता होय.

मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ च्या कलम २ नुसार, “मानवी हक्क” याचा अर्थ संविधानाने हम्मी दिलेल्या किंवा आंतरराष्ट्रीय प्रसंविदेमध्ये संनिविष्ट केलेले आणि भारतामध्ये न्यायालयाद्वारे अंमलात आणण्याजोगे असलेले, व्यक्तीच्या जीवन, स्वातंत्र्य, समानता आणि प्रतिष्ठेशी संबंधातील हक्क,असा आहे.[४]

अनुसूचित जाती संकल्पना

सुरूवातीला अनुसूचित जातींचा उल्लेख 'अस्पृश्य' या शब्दाने करत असत. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या उद्देशाने अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले त्यात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'मानवी अस्पृश्य' असा शब्दप्रयोग काही काळ केला त्यानंतर १९०६ साली 'निराश्रित' हा शब्द वापरला. 'डिप्रेस्ड क्लास' या शब्दाऐवजी 'डिप्रेस्ड कास्टस्' हा शब्दप्रयोग केला होता व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तो स्विकारला तसेच महात्मा गांधी यांनी 'हरिजन' हा शब्द प्रयोग वापरला. त्यावेळी या जातींचा उल्लेख करताना जास्त हिनत्व दर्शविणारा शब्द सरकारी पातळीवर वापरणे बरोबर नाही म्हणून राखीव जागासंबंधी आदेशाला जोडलेल्या परिशिष्टातील जाती या अर्थाने 'शेड्यूल्ड कास्टस' म्हणजे परिशिष्ट किंवा अनुसूची हा शब्द वापरला जात असे. सन १९३५ मध्ये पार्लमेंटने मंजूर केलेल्या कायद्यातही शेड्यूल्ड कास्टस हा शब्द वापरण्यास सुरुवात झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने राज्यघटनेत 'शेड्यूल्ड कास्टस' या शब्दाचा उल्लेख करण्यात आला. शेड्यूल्ड कास्टसचे मराठी 'अनुसूचित जाती' असे करण्यात येते. भारतामध्ये सर्वप्रथम १८८१ साली जनगणना पार पडली.[५] यानुसार निरनिराळया राज्यातील दलितांच्या आकडेवारीचे वर्णन केल्याचे दिसून येते. या जनगणनेत दलित जातीचे लोक हे खालच्या यादीत असत. दलित जाती व्यवसाय, धंद्या, शेतमजूर, चामड्याचे काम करणारे कामगार, गावकी कामे करणारे कामगार, सफाई कामगार, पहारेकरी आणि खेड्यातील किरकोळ हलके काम करणारे अशाचा या श्रेणीत समावेश केला जात असे.[६] १९३१ मध्ये अस्पृश्यांचा उल्लेख दलित म्हणून सर्वप्रथम केला आणि अनुसूचित जाती हा शब्द सर्वप्रथम एप्रिल १९३४ मध्ये वापरला गेला. इंग्रज सरकारने भारतासंबधी जो आदेश १९३६ मध्ये दिला त्यानुसार काही जाती, आणि जमाती या अनुसूचित जातीमध्ये गणल्या जाऊ लागल्या. या पूर्वी सदर लोकांचे गट मागासवर्गीय म्हणून ओळखले जात असत. या शब्दाचे मूळ १९३१ सालच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गोलमेज परिषदेला सादर केलेल्या प्रस्तावांमध्ये

'डिप्रेस्ड क्लास' असा उल्लेख केला होता. भारतीय राज्य घटनेमध्ये कलम ३३८ नुसार अनुसूचित जातीसाठी विशेष तरतुदीची सोय करण्यात येऊन अनुसूचितजाती संरक्षाणासाठी यंत्रणा निर्माण करून अनुसूचित जाती-जमाती आयोग स्थापन करण्यात आला. त्यानुसार भारतीय राज्य घटनेतील अनुसूचित जातीची यादी ही १९७८ नुसार प्रसिद्ध आहे यामध्ये ५९ जातीचा समावेश आहे.[७]

भारतातील अनुसूचित जातीला समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी भारत सरकारने १९७८ साली भारतीय संविधानातील कलम ३३८ नुसार अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय आयोग ही भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाच्या अखत्यारीतील एक भारतीय संवैधानिक संस्था स्थापन केली. ज्याची स्थापना अनुसूचित जाती समुदायांच्या शोषणाविरूद्ध संरक्षण प्रदान करण्यासाठी, त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी संरक्षण करण्यासाठी करण्यात आली आहे. ८९ व्या घटनादुरुस्तीने अनुसूचित जाती आणि जमाती आयोगाचे विभाजन करू अनुसूचित जातीच्या हक्कासाठी कलम ३३८ क समावेश करून अनुसूचित जमती आयोग स्थापन करण्यात आला. या विशेष कायद्याची निर्मिती केली असली तरी भारतीय राज्यघटनेने भाग तिनमध्ये भारतीय नागरिकांना मुलभूत अधिकार बहाल केले आहेत. आणि या अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी कलम ३२ मध्ये न्यायालयीन पुनर्विलोकनाचा हक्क दिला आहे.[८]

महाराष्ट्र शासनाचा सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्या, व विशेष साहाय्य विभागच्या निर्णयानुसार १ मार्च २००९ राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाची निर्मिती करण्यात आली. अनुसूचित जातीवर होणारे अन्याय अत्याचाराची नोंद ही वार्षिक अहवाल २०१७-१८ च्या आकडेवारीनुसार अनुसूचित जातींवरील गुन्ह्यांचे विश्लेषण करण्याच्या हेतूने, NCRB (National Crime Records Bureau) द्वारे प्रदान केलेल्या आकडेवारीनुसार, नागरी हक्क कायद्यांतर्गत नोंदवल्या जाणाऱ्या गुन्ह्यांची संख्या कमी होत आहे कारण एससी आणि एसटीवरील अत्याचाराची प्रकरणे प्रामुख्याने अट्रोसिटी

कायद्यांतर्गत नोंदवली जात आहेत.[९] २०१६ मध्ये अनुसूचित जातींच्या विरोधात ४०८०१ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली होती, २०१७ मध्ये ही संख्या ४३२०३ आणि २०१८ मध्ये ४२७९३ इतकी झाली आहे. याच माहितीच्या आधारे २०१७ मध्ये सर्वाधिक घटना घडलेली पाच राज्ये म्हणजे उत्तर प्रदेश (११४४४,), बिहार (६७७४), मध्यप्रदेश (५८९२), राजस्थान (४२३८), आंध्र प्रदेश आणि ओडिशा दोन्ही (१९६९). २०१६ मध्ये सर्वाधिक प्रकरणे असलेली राज्ये उत्तर प्रदेश (१०४२६), बिहार (५७०१), राजस्थान (५१३४), मध्यप्रदेश (४९२२) आणि कर्नाटक (१८६९) होती. तर २०१८ मध्ये सर्वाधिक घटना घडलेल्या पाच राज्यांमध्ये उत्तर प्रदेश (११९२४), बिहार (७०६१) मध्यप्रदेश (४७५३), राजस्थान (४६०७) आणि महाराष्ट्र (१९७४) होते.

अनुसूचित जाती महिलांविरुद्ध गुन्हे ही २०१७ मध्ये सर्वाधिक अनुसूचित जाती बलात्कार पीडित राज्यांमध्ये उत्तर प्रदेश (५४९), मध्यप्रदेश (५११) आणि राजस्थान (३०६) होते. ते प्रमाण वाढून २०१८ मध्ये सर्वाधिक अनुसूचित जातीच्या महिला बलात्कार पीडित राज्यांमध्ये उत्तर प्रदेश (५२६), मध्यप्रदेश (४७४) राजस्थान (३८५) आणि महाराष्ट्र (३१३) अशा स्वरुपात नोंद करण्यात आली आहे.[१०]

अनुसूचित जाती आयोगाची वंचित समजल्या जाणाऱ्या अनुसूचित जातीसाठी आयोग विविध कार्य पार पाडत असते ते पुढील प्रमाणे अनुसूचित जातीसाठी राज्य शासनाकडून उपलब्ध सवलती व हक्कांसाठी तरतूदीप्रमाणे सद्यस्थितीचा अभ्यास करणे व शासनास उपाययोजना सुचविणे. अनुसूचित जातीच्या तक्रारीची चौकशी करणे. अनुसूचित जातीच्या सामाजिक, आर्थिक विकासाच्या योजना प्रक्रियेत भाग घेऊन शासनास सल्ला देणे व मुल्यांकन करणे. अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ प्रमाणे दाखल प्रकरणांचा आढावा घेणे, पिडीत व्यक्तीस देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याचा आढावा घेणे. अनुसूचित जाती कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक तक्रारी

स्विकारणे व तपास करणे. अनुसूचित जातीसंबंधी धोरणाचा आढावा घेणे. शासनास अनुसूचित जातीसाठी कल्याणकारी योजना संबंधी सल्ला देणे. अनुसूचित जातीतीच्या, कल्याण, आरक्षण, संरक्षण, विकासा संबंधी इतर बाबी राज्य शासनाकडून ठरविण्यात येतील त्याबद्दल कार्यवाही करणे. अनुसूचित जातीच्या यादीमध्ये जातीचा समावेश किंवा वगळण्यासाठी शिफारस करणे. भारतीय राज्यघटनेने निर्माण केलेले भारतीय नागरिकांसाठीच्या अधिकाराचे समान हक्क म्हणून अनुसूचित जातीलादेखील देण्यात आले आहेत त्या अधिकाराची योग्य अंमलबजावणी देखरेख करणे.[११] वरील अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या कार्यामुळे अनुसूचित जातीच्या मानव अधिकाराचे संरक्षण होत असले तरी आधुनिक काळात देखील अनुसूचित जातींना अन्याय अत्याचाराला सामोरे जावे लागते.

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा

संशोधन कार्य हे पूर्व संशोधन साहित्याचा आधार घेऊन आखणी करावे लागते त्या संदर्भाने प्रस्तुत प्रस्तुत संशोधन कार्यासाठी पुढील संशोधन साहित्याचा अभ्यास करण्यात आला.

थोरात सुखदेव (२०१८) यांनी 'अस्पृश्यता, जातीय भेदभाव आणि दलितांवरील अत्याचार: व्याप्ती, करणे आणि उपाय' ग्रंथात आर्थिक आणि सामाजिक विवेचन करताना अनुसूचित जाती आणि जमातीच्या हक्कविषयक घटकांचा आणि त्यावरील उपाय योजनांचा अभ्यास केला. अस्पृश्यता, जातीय भेदभाव आणि दलितांवरील अत्याचार या गोष्टीसाठी असलेली उच्चवर्गीयाची मानसिकता जबाबदार असते. अत्याचार रोखण्यासाठी कायद्याची अमलबजावणी योग्य होणे गरजेचे आहे असे त्यांचे म्हणणे आहे.[१२]

देशमुख शिला (२०२१) यांनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे पीएचडी संशोधन कार्यासाठी 'कोल्हापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती आणि बिगर अनुसूचित जाती यांच्यातील बदलते सामाजिक संबंध' या विषयाचा अभ्यास करून अनुसूचित जातीच्या

सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक अधिकाराचा अभ्यास केला त्यांना या अभ्यासातून असे निदर्शनास आले की इतर जातीला अनुसूचित जाती पेक्षा सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक हक्क उपभोगण्यासाठी कमी प्रमाणात कष्ट घ्यावे लागतात. उच्च वर्गीय समाजातील नागरिक हे प्रस्थापित असून अनुसूचित जातीवर अत्याचार करतात. त्यांनी अनुसूचित जाती आणि जमाती आयोगाच्या यंत्रणेन कडक पाऊले उचलण्याची शिफारस केली आहे.[१३.]

खंडेला मानचंद (२००८) यांनी 'दलित अधिकार एंव व्यवहार' या ग्रंथातून अनुसूचित जात आणि जमातीसाठी हक्क संरक्षणासाठी भारतीय संविधानाने कायदे निर्माण केले १९५५ चा नागरी संरक्षण अधिकार कायदा आणि १९८९ च्या अनुसूचित कायदे या कायद्याद्वारे त्यांच्या मानवी हक्कांना सामाजिक आणि राजकीय वातावरण निर्माण करून देण्याचा प्रयत केला आहे. परंतु दलितांवर होणारे अन्याय आत्याचार होतच आहेत. त्यांनी कायदे तयार करणे आणि त्याची अमलबजावणी करणे या दोन्ही बाबी भारतात वेगळया आहेत हे यावरून लक्षात येते. उच्चजातील क्रूरवृत्ती ह्या उच्चदर्जा टिकवून ठेवण्यासाठी दलितांवर सतत अन्याय अत्याचार करत असतात. दलितांच्या वेगळया पारंपरिक व्यवसायात जखडून ठेवणे, जेणेकरून ते गरिबी आयुष्य घालवतील असा प्रबल्ला उच्चजातीतील लोकांचा विश्वास आहे. दलितांच्या संरक्षणासाठी कठोर कायदे निर्मिती झाली तरी अनुसूचित जातीच्या हत्या आणि महिला अत्याचार, शाळा-महाविद्यालयातून भेदभाव आणि सार्वजनिक ठिकाणी नकारात्मक भावना व दिला न जाणारा प्रवेश तसेच पोलिस प्रशासनाचा असंवेदनशीलता यामुळे घटनात्मक तरतुदी आणि कायद्याचे संरक्षण असले तरी अनुसूचित जाती या मानवी अधिकारांपासून वंचित राहून जीवन जगावे लागत आहे.[१४.]

आनंद सुगंधे व विनोद सेन (२०१६) यांनी सोसिअल अक्शन या मासिकात 'Scheduled Caste in Maharashtra Struggle and Hurdles in their socio- economic Development' हा संशोधन लेख महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातींवर होणाऱ्या अन्याय, अत्याचार आणि मानवाधिकार उल्लंघनविषयी संशोधन कार्य केले आहे. या

संशोधन कार्यानुसार अनुसूचित जातींवर दिवसेंदिवस अन्याय, अत्याचार आणि मानवाधिकार उल्लंघन घटना वाढत चाललेल्या आहेत. मुख्यत: मराठा व अल्पसंख्यांक उच्चवर्गीय लोक हे महार, मातंग, चांभार, यांच्यावरील अन्यायाच्या घटना अधिक आहेत. कारण या जाती पूर्वीपासून परंपरागत गावकी, व्यवसाय, शेतमजुरी, घरगडी, सालगडी ही कामे उच्च जातीच्या लोकांसाठी करत आलेली असून सद्यपरिस्थित अनुसूचित जाती या आर्थिक, सामाजिक परिस्थितीमध्ये सुधारणा करत आहेत. त्यामुळे परंपरागत चालत आलेली कामे न करता नौकरीव स्वत:च्या व्यवसाय करत आहेत त्यामुळे त्यांना अन्याय अत्याचाराला सामोरे जावे लागत आहे.[१५]

बेसियन टी. (२००१) यांनी सोसिअल अक्शन मासिकामध्ये "Development Challenges of 21st Century" याविषयी संशोधन केले. त्यांनी या संशोधन कार्यासाठी ग्रामीण भागातील दलित समाजाचे अध्ययन करून दलितांना अन्याय, अत्याचाराला नियमित स्वरूपात सामोरे जावे लागते का हे निरीक्षण करण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार त्यांना प्रामुख्याने ग्रामीण भागातील दलितांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराचे प्रमाण अधिक असून दिवसेंदिवस वाढत चालले असल्याचे दिसून आले. दलित समाज काही गोष्टीकरिता सवर्ण समाजाला सामजिक आणि आर्थिक बाबीसाठी विरोध करण्याचा प्रयत्न करतात त्यावेळी अनुसूचित जातींना अत्याचार होतात. यामध्ये त्यांचा खून करणे, महिलेवर बलात्कार करणे, वस्तीवर हल्ले करणे, त्यांच्या मालमत्तेचे नुकसान करणे इत्यादी अशा घटना नियमित घडत असतात. अनुसूचित आयोग आणि मानवाधिकार आयोग हे त्यांचे हक्क संरक्षण करण्याचा प्रयत्न करत असतात. परंतु अज्ञान आणि आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना न्याय मागण्यात अडचणी येतात.[१६]

शंकर जाधव (२०२०) यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत पीएचडी संशोधन कार्य 'स्थानिक प्रशासन आणि दलितांचे हक्क-विशेष संदर्भ नांदेड

जिल्हा' या विषयावर केले असता त्यांच्या संशोधन निष्कर्षातून स्थानिक प्रशासनामध्ये होणाऱ्या भेदभाव यावर प्रकाश टाकला. त्यांनी संशोधन अभ्यासासाठी निवडलेल्या एकूण उत्तरदात्यापैकी ८७.४ टक्के उत्तरदाते हे स्थानिक प्रशासनात भेदभाव केला जातो असे असे म्हणतात. त्याचबरोबर त्यांनी स्थानिक प्रशासनामध्ये मानवी हक्काचे हनन होते या विषयासंदर्भात माहिती घेतली असता त्यांना एकूण उत्तरदात्यापैकी ४३७ उत्तरदाते हे स्थानिक प्रशासनामध्ये मानवी हक्कांचे हनन होते. या मानवी हक्काचे हनन झाल्यानंतर ६८ टक्के उत्तरदाते हे विविध प्रकारच्या साधनांचा वापर करून तक्रार दाखल करतात असे दिसून आले. यावरून आपणास असे दिसून येते की स्थानिक प्रशासन किंवा मानवी अधिकाराचे कायद्याच्या उल्लंघनासंबंधी विविध साधनांच्या आधारे तक्रारी या नोंदविल्या जातात त्यामध्ये अनुसूचित जाती आयोग यांच्याकडे देखील मानवाधिकार उल्लंघनाच्या तक्रारी नोंदवल्या जातात असे दिसून येते. राज्यघटनेतील हक्क हे दलितांना माहित आहेत का यावर २२ टक्के उत्तरदाते हे अधिकाराची माहिती असणारे आहेत तर ७८ टक्के उत्तरदाते हे मानवी अधिकाराची माहिती नाही असे सांगतात म्हणजेच मानव अधिकार हे सर्वांगीण विकास होण्यासाठी गरजेचे असले तरीही या अधिकाराची माहिती सर्वसामान्यांना नाही असे दिसून आले.

मानव हक्क आयोग किंवा अनुसूचित जाती आयोग याबद्दल ७४.५ टक्के उत्तरदाते यांना माहिती नाही असे सांगतात त्यापैकी फक्त 25.५ टक्के उत्तरदाते हे माहिती आहे सांगतात यावरून असा निष्कर्ष करण्यात येतो की अनुसूचित जातींचा हक्क संरक्षणासाठी विविध आयोग आणि कायद्याची निर्मिती केली असली तरीही मानवी हक्क संरक्षणापासून अनुसूचित जातींना या आयोगाबद्दल आणि मानवी हक्कांच्या तरतुदीबद्दल अज्ञानी आहेत.[१७]

वरील संशोधन साहित्याच्या आधारे अनुसूचित जातींना विविध समस्यांना सामोरे जावे लागते तसेच त्यांच्या मानावी हक्कांच्या संरक्षणासाठी निर्माण करण्यात आलेल्या अनुसूचित जाती आयोग, मानवी हक्क आयोग इत्यादी हक्क संरक्षण आयोगाबदलची माहिती ही कमी असल्याचे दिसते. अनुसूचित जाती हक्क संरक्षनासाठी राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग महत्वाची भूमिका बजावतात आणि अनुसूचित जातींना शासनाकडून

निर्माण केलेल्या योजनांचा लाभ कसा मिळतो हे प्रस्तुत संशोधन अभ्यासातून अभ्यासात येईल.

संशोधनाचे महत्त्व :

मानव निसर्गत: मुक्त प्राणी असल्यामुळे जात, धर्म, वर्ण,लिंग, वंश, वेशभूषा, प्रांत, भाषा, व्यवसाय इत्यादी असा भेदभाव केला जात नाही परंतु मानवाने केलेल्या प्रगतीमुळे मानव जातीचा विकासाबरोबर भेदभाव केला जात आहे. अनुसूचित जाती हा समाजातील उपेक्षित घटक असून मुख्य सामाजिक प्रवाहापासून नेहमीच मागे राहिला आहे. त्यामुळे समाजातील एक मोठा घटक अन्याय-अत्याचाराला बळी पडत असल्याने “अनुसूचित जाती हक्क संरक्षणामध्ये राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाची भूमिका” या अभ्यासातून अनुसूचित जातींच्या समस्यांचा अभ्यास करणे आणि या अभ्यासातून राज्य अनुसूचित जाती आयोगाच्या कामकाजाची कार्यपद्धती मार्फत अनुसूचित जातींचे होणारे संरक्षण या संदर्भात अभ्यास करण्यात येईल. त्यानुसार आलेल्या विविध उपाय योजनांचे मूल्यमापन करता येईल तसेच अस्तित्वात असलेल्या योजना व कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का नाही हे तपासता येईल. त्याचबरोबर योजनाकारांना कायदे निर्मितीसाठी व अनुसूचित जातींच्या मानवाधिकाराची जोपासना करण्यामध्ये या संशोधनाची मदत होईल. या संशोधनाद्वारे येणाऱ्या शिफारशींचा योग्य अर्थ लावून अनुसूचित जातींच्या नवनवीन सुविधा पुरवण्यासाठी मदत होईल आणि अनुसूचित जातींचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी मदत होईल.

समस्या सूत्रण :

अनुसूचित जाती हा समाजातील अतिशय दुर्लक्षित घटक आहे. अनुसूचित जाती हक्काविषयी मानवाधिकार दृष्टिकोनातून या दुर्लक्षित भागाचे संशोधन केले पाहिजे असे मला लक्षात आले म्हणून “अनुसूचित जाती हक्क संरक्षणामध्ये राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाची भूमिका” ही संशोधन समस्या निवडण्यात आली. अनुसूचित जातींना मानवाधिकाराचे उल्लंघन झाल्यानंतर अनुसूचित जाती आयोगाकडून संरक्षण मिळते का?

अनुसूचित जाती हा सामाजिक उपेक्षित घटक असल्यामुळे मानव अधिकाराचे उल्लंघन झाले आहे का? अनुसूचित जाती आयोग वंचित घटकांच्या अधिकाराचे उल्लंघन झाल्यानंतर कोणत्या पद्धतीने त्यांच्या अधिकाराचे संरक्षण करते का? अनुसूचित जाती या समाजातील वंचित घटक आहेत त्यामुळे त्यांच्यात स्वत:च्या अधिकाराबाबत उदासीनता असल्याचे दिसून येते का? या विविध कारणामुळे ही संशोधन समस्या निवडण्यात आली.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. अनुसूचित जाती आयोगाची रचना व कार्य अभ्यासणे.
२. अनुसूचित जातीच्या संरक्षणासाठी विविध घटनात्मक तरतुदी आणि उपाययोजनांचा अभ्यास करणे.
३. अनुसूचित जातीच्या संरक्षणात्मक आयोगाची कायदे निर्मिती आणि पुनर्वसन योजनाचा अभ्यास करणे.
४. अनुसूचित जातीच्या अधिकाराचे उल्लंघन झाल्यानंतर कोणत्या पद्धतीने त्यांच्या अधिकाराचे संरक्षण होते हे तपासणे.
५. अनुसूचित जाती हक्क संरक्षणासंदर्भात लाभार्थ्यांच्या भूमिकेचे वर्णन करणे.

संशोधनाची गृहितके :

१. अनुसूचित जाती हा सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग असल्यामुळे त्यांच्यात मानव अधिकाराबाबत उदासीनता आहे.
२. अनुसूची जाती आयोगाची रचना ही अनुसूचित जातीचा सामाजिक दर्जा उचावाण्यासाठी करण्यात आली आहे.
३. अनुसूचित जातीच्या मानवाधिकाराचे उल्लंघन झाल्यानंतर त्यांना आयोगाकडून संरक्षण मिळते.
४. अनुसूचित जाती आयोग अनुसूचित जातीच्या अधिकाराचे उलंघन झाल्यानंतर पुनर्वसन करून त्यांच्या अधिकाराचे संरक्षण करते.

५. अनुसूचित जाती आयोगाने विविध कायदे निर्मिती करून त्यांच्या हक्कांचे संरक्षण केले आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने गुणात्मक आणि संख्यात्मक अशा मिश्र पद्धतीचा वापर करण्यात येईल.

तथ्य संकलनाचे तंत्रे :

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी प्राथमिक तथ्य संकलन आणि दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात येईल. प्राथमिक तथ्य संकलनामध्ये व्यष्टी अध्ययन, मुलाखत अनुसूची आणि निरीक्षण या संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल तसेच दुय्यम तथ्य संकलन करण्यासाठी लागणारी माहिती संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्र, शोध प्रबंध, इंटरनेट, विविध प्रकाशित अप्रकाशित साहित्य इ. माहितीचा वापर करण्यात येईल.

नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनासाठी गैर संभाव्यता संशोधन पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येईल. संशोधनासाठी संशोधकाने मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याची निवड केलेली असून यामध्ये अनुसूचित जाती आयोगाने संरक्षण दिलेल्या लाभार्थींची व अन्याय अत्याचार झालेल्या परंतु कोणतेही संरक्षण मिळाले नाही अशा अनुसूचित जातींची सहेतुक नमुना निवड पद्धतीद्वारे प्रत्यक्ष सर्वेक्षणसाठी निवड केली जाईल. संगणकाच्या आधारे SPSS सॉफ्टवेअरचा वापर करून तथ्यांचे अर्थ विश्लेषण आणि निर्वाचन करण्यात येईल.

संशोधन आराखडा:

संशोधन कार्य वस्तूनिष्ठ होण्यासाठी संशोधन आराखडा महत्वाचा असतो. प्रस्तुत संशोधन कार्य गतिमान व्हावे आणि या अभ्यासातून येणारे अनुमान आणि निष्कर्ष अचूक असावेत म्हणून विश्लेषणात्मक संशोधन आराखडा वापरण्यात येईल.

संशोधन मर्यादा

प्रस्तुत संशोधन हे अनुसूचित जाती हक्क संरक्षणामध्ये राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाची भूमिका एवढ्या पुरतेच आहे. अनुसूचित जातीच्या समस्यांचा आणि अनुसूचित जाती आयोगाची कार्य आणि उपाययोजनांचा संशोधनामध्ये अभ्यास करण्यात येईल. सदरील संशोधनासाठी २०१२ ते २०२२ हा कालखंड निवडण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातींच्या समस्या व अनुसूचित जाती आयोगाच्या मानव अधिकार कार्यापुरताच मर्यादित राहील.

प्रकरणाची रूपरेषा :

प्रस्तुत संशोधान कार्य हे पुढील प्रमाणे प्रकरणाच्या आधारे विभागले जाईल.

प्रकरण पहिले : प्रस्तावना.

प्रकरण दुसरे : साहित्याचे पुनरावलोकन

प्रकरण तिसरे : संशोधन पद्धती.

प्रकरण चौथे : तथ्यांचे विश्लेषण.

प्रकरण पाचवे: निष्कर्ष, सारांश, गृहितकांची पडताळणी, सैद्धांतिक चर्चा आणि सूचना.

संदर्भ सूची :

१. थोरात, सुखदेव. २०१२. दलित निरंतर विषमता आणि दारिद्र्य, सुगावा प्रकाशन, पुणे. पृ. क्र. ८

२. शास्त्री, टी. एस. एन. २०१६. मानव अधिकार आणि कर्तव्य: शिक्षण कार्यक्रम. मासूम प्रकाशन, पुणे. पृ. ४५

३. ह्युमन राईट्स (प्रश्न आणि उत्तरे) नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली. पृ. क्र. ८.

४. मानव हक्क संरक्षण अधिनियम . १९९३. नई दिल्ली . पृ. क्र. १.

५. देशमुख, शिला. २०२१. कोल्हापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती आणि बिगर अनुसूचित जाती यांच्यातील बदलते सामाजिक संबंध. अप्रकाशित पीएचडी शोध प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. पृ. क्र. ६.

६. कित्ता पृ. क्र. ७.

७. ग्रोवर, बी.एल. २०१३. आधुनिक भारताचा इतिहास. एस. चांद पब्लि. दिल्ली. पृ.क्र. ३०.

८. आंबेडकर, बी. आर. २०१८. भारतीय संविधान, सुधीर प्रकाशन, वर्धा. पृ. क्र. २३४

९. राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग वार्षिक अहवाल, २०१७-१८. पृ.क्र. २५०

१०. राष्ट्रीय अनुसूचित आयोग संकेतस्तळ दिनांक १९/१२/२०२३ https://ncsc.nic.in/pages/display/17

११. महाराष्ट्रराज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे संकेतस्तळ दिनांक ०२/०१/२०२४ https://sjsa.maharashtra.gov.in/mr/maharashtra-state-commission-sc-st-mr

१२. थोरात, सुखदेव.२०१८. महाराष्ट्रातील अस्पृश्यता, जातीय भेदभाव आणि दलितांवरील अत्याचार: व्याप्ती, करणे आणि उपाय. सुगावा प्रकाशन, पुणे. पृ. क्र. २०.

१३. https://shodhganga.inflibnet.ac.in/jpui/biteam/10603/384683/13/3%20chapter%207.pdf

१४. खंडेला, मनचंद. २००८. दलित हक्क आणि व्यवहार. पॉइंटर पब्लिशर्स, जयपूर. लेह, लेविन.१९९२.

१५. Sugandhe, Anand. and Sen Vinod. 2015. Scheduled Caste in Maharashtra: Struggle and Hurdles in their Socio Economic Development, Journal of Indian Research, delhi. Page 103

१६. Thasian, T., Development Challenges of 21st Century, Social Action, Vol. 51, No. 1.

१७. जाधव एस. २०२०.स्थानिक प्रशासन आणि दलितांचे हक्क-विशेष संदर्भ नांदेड जिल्हा. अप्रकाशित शोधप्रबंध, स्व.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड. पृ.क्र. १८७

संशोधक

भिसे चंद्रकांत बालाजी

मार्गदर्शक

प्रा .डॉ. कांबळे एन.टी.

समाजशास्त्र विभाग,स्वामी विवेकानंद महाविद्याय,

शिरूर ताजबंद ता. अहमदपूर जि. लातूर